आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३ एप्रिल २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- वक्फ सुधारणा विधेयक आज राज्यसभेत सादर/ विधेयक लोकसभेत काल २८८ विरुद्ध २३२ मताधिक्यानं मंजूर

- सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांच्या मालमत्तेची माहिती संकेतस्थळावर जाहीर होणार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी थायलंडमधल्या बँकॉक इथे पोहोचले

**आणि**

- आयएसएसएफ करंडक नेमबाजी स्पर्धा आजपासून अर्जेटिंनात ब्युनॉस आयर्स इथं सुरू होणार

**<><><><><>**

वक्फ बोर्डाच्या जमिनींवषयीचं वक्फ सुधारणा विधेयक आज राज्यसभेत चर्चेला आलं आहे. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी विधेयक मांडताना सांगितलं, की या विषयी नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीने एक कोटीपेक्षा जास्त सूचना आणि हरकतींचा अभ्यास करुन मसुदा तयार केला आहे. वक्फ जमिनींचा योग्य वापर झाला असता तर देश बदलला असता अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

लोकसभेत काल रात्री उशिरा वक्फ सुधारणा विधेयक २०२५ मंजूर करण्यात आलं. विधेयकाच्या बाजूनं २८८ सदस्यांनी मतदान केलं, तर २३२ सदस्यांनी विरोधात मतदान केलं. रात्री उशिरापर्यंत विधेयकावर चर्चा झाल्यानंतर मतदान घेण्यात आलं.

वक्फच्या मालमत्तांच्या व्यवस्थापनाचं सुसूत्रीकरण करण्याबरोबरच वारसास्थळांची सुरक्षा आणि सामाजिक कल्याणाला प्रोत्साहन देणं हा वक्फ सुधारणा विधेयक २०२५ चा उद्दश आहे. मालमत्तांच्या व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता वाढवणं, वक्फ मंडळं आणि स्थानिक अधिकारी यांच्यामध्ये समन्वय वाढवणं आणि सर्व संबंधितांच्या हक्कांचं रक्षण करणं यावरही या विधेयकात भर आहे. वक्फ मंडळांना अधिक सर्वसमावेशक बनवणं, वक्फच्या सुशासनासाठी आणि निर्णयांसाठी मुस्लिम समाजातील सर्व पंथांना प्रतिनिधीत्व देणं हा विधेयकाचा उद्देश आहे. यापूर्वी, संयुक्त संसदीय समितीनं अहवाल दिल्यानुसार लोकसभेत वक्फ (सुधारणा) विधेयकावर चर्चा झाली. भारत हा अल्पसंख्याक समुदायासाठी सर्वात सुरक्षित देश आहे, या विधेयकाचा मुस्लिमांच्या धार्मिक प्रथांशी काहीही संबंध नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

विरोधकांना उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, मंत्रिमंडळानं मंजूर केलेल्या संयुक्त संसदीय समितीनं सविस्तर चर्चा केल्यानंतर हे विधेयक आणलं आहे. वक्फ मंडळांमध्ये कोणतेही मुस्लिमेतर सदस्य नसतील, असं त्यांनी स्पष्ट केलं.अल्पसंख्याकांमध्ये भीती पसरवण्यासाठी आणि आपली मतं सुरक्षित राखण्यासाठी या विधेयकाबाबत अपप्रचार केला जात आहे, असंही ते म्हणाले. चर्चेला सुरुवात करताना, काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी सरकारवर या विधेयकाद्वारे लोकांची दिशाभूल करण्याचा आरोप केला. ते म्हणाले की, हे विधेयक संविधानाविरोधी आहे. या कायद्यातील सुधारणांमुळे अधिक समस्या निर्माण होतील, अशी टीका त्यांनी केली. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी महागाई, बेरोजगारी, आणि इतर मुद्द्यांशी संबंधित अपयश लपवण्यासाठी सरकारनं हे विधेयक आणलं आहे, अशी टीका केली. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी प्रस्तावित कायदा चुकीचा, तर्कहीन आणि मनमानी असल्याचं म्हटलं. द्रमुकचे ए. राजा यांनी विधेयक घटनाबाह्य असल्याचा आरोप केला. विरोधक राज्यघटनेचे

सोयीनं दाखले देत असल्याची टीका भाजपाचे रविशंकर प्रसाद यांनी केली. वक्फच्या अनेक मालमत्ता पडून आहेत आणि चुकीच्या उद्देशानं त्यांचं गैरव्यवस्थापन होत आहे, असं टीडीपीचे कृष्णाप्रसाद टेन्नेटी म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेस अध्यक्ष आणि खासदार मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर भाजपा खासदार अनुराग ठाकूर यांनी काल लोकसभेत जमीन हडपल्याचा आरोप केला होता. या निषेधार्थ आज विरोधी सदस्यांनी राज्यसभेतून सभात्याग केला. अनुराग ठाकूर यांनी माफी मागावी, अशी मागणी यावेळी त्यांनी केली. राज्यसभेत अशा प्रकारे कोणाचीही प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये अशी अपेक्षा राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी यावेळी व्यक्त केली. त्यांनी आचारसंहिता समितीला या संदर्भात निश्चित पद्धती निर्माण करावी असं आवाहनही केले. सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकलेले मुद्दे संघर्षाचे कारण होऊ नये असंही ते म्हणाले. त्यानंतर विरोधी पक्ष सदस्यानी सभात्याग केला.

दरम्यान देशात अल्पसंख्यांकांवर झालेल्या हल्ल्यांच्या निषेधार्थ काँग्रेसचे केरळमधील खासदार आणि इतर विरोधी सदस्यांनी लोकसभेतूनही सभात्याग केला.

**<><><><><>**

भारतीय लोकशाहीचं सर्वसमावेशक स्वरूप दर्शवणारं राज्यसभा हे संसदेचं स्थायी सभागृह असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. आज राज्यसभा दिनानिमित्त ते सभागृहात बोलत होते…

**होल्ड - बाईट- धनखड……**

१९५२ मधे ३ एप्रिल रोजी राज्यसभा अस्तित्वात आली.

**<><><><><>**

न्यायव्यवस्थेवरचा जनतेचा विश्वास वाढावा तसंच त्यात पारदर्शकता यावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांनी त्यांच्या मालमत्तेची माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध करून देण्यासाठी सहमती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांची बैठक १ एप्रिल रोजी झाली, या बैठकीत सर्व न्यायाधीशांनी हा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर याची घोषणा केली जाणार आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी रोकड सापडल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**<><><><><>**

भविष्य निर्वाह निधीच्या खातेदाराला वारसाचं अद्ययावतीकरण करण्यासाठी शुल्क द्यावं लागू नये यासाठी अर्थमंत्रालयाने सरकारी बचत प्रोत्साहन कायदा २०१८ मधे बदल केले आहेत. काल एका अधिसूचनेद्वारे हे बदल केल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी समाजमाध्यमाद्वारे सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी थायलंडमधल्या बँकॉक इथे पोहोचले. विमानतळावर थायलंडचे उपप्रधानमंत्री सूर्या जुआनग्रुआंकित यांनी मोदी यांचं स्वागत केलं. थायलंडमधला भारतीय समुदायही प्रधानमंत्र्यांच्या स्वागतासाठी मोठ्या संख्येनं आला होता. त्यानंतर मोदी यांच्या स्वागतार्थ भरतनाट्यम आणि थायलंडच्या शास्त्रीय नृत्यशैलीचा मिलाफ दाखवणारा कार्यक्रम सादर करण्यात आला.

या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी आज संध्याकाळी थायलंडच्या प्रधानमंत्री पेतोंगटार्न शिनावात्रा यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करून दोन्ही देशांमधल्या संबंधांचा आढावा घेतील. या दरम्यान ते द्विपक्षीय करारांवरही स्वाक्षरी करतील. सहाव्या

बिमस्टेक शिखर परिषदेसाठी ते उद्या उपस्थित राहणार आहेत. या शिखर परिषदेत अनेक करार आणि घोषणा होण्याची शक्यता आहे. ही परिषद आटोपून मोदी उद्या तीन दिवसांच्या श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

**<><><><><>**

सध्याच्या जागतिक व्यवस्थेतली अस्थिरता तसंच अनिश्चितता पाहता बिमस्टेकच्या सदस्य देशांनी या संघटनेच्या माध्यमातून काम करताना महत्त्वाकांक्षी दृष्टिकोन बाळगावा, असं आवाहन परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज केलं. थायलंडमध्ये बँकॉक इथे झालेल्या विसाव्या बिमस्टेक मंत्रिस्तरीय बैठकीला ते संबोधित करत होते. बिमस्टेक संघटना ही भारताच्या ॲक्ट ईस्ट, नेबरहूड फर्स्ट आणि महासागर या तिन्ही उपक्रमांचं प्रतिनिधित्व करतं असल्याचंही जयशंकर यावेळी म्हणाले. बिमस्टेक देशांमध्ये येणाऱ्या पर्यटकांत भारतीयांची संख्या अधिक असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं. तसंच, सायबर सुरक्षा, दहशतवाद, मानवी तस्करी, अंमली पदार्थांचा व्यापार या बिमस्टेक देशांना भेडसावणाऱ्या आव्हानांचा अधिक गांभीर्याने विचार करणं गरजेचं असल्याचंही जयशंकर यांनी या बैठकीत नमूद केलं.

**<><><><><>**

अमेरिकेत भारतातून आयात होणाऱ्या मालावर २६ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. भारतात अमेरिकी मालावर लावल्या जाणाऱ्या शुल्काचं प्रत्युत्तर म्हणून हे शुल्क आकारण्यात येणार असल्याचं त्यांनी पत्रकारपरिषदेत सांगितलं. इतरही अनेक देशांकडून अमेरिकेत आयात होणाऱ्या मालावर अशा प्रकारचं प्रत्युत्तर शुल्क अमेरिकेनं लावलं आहे.

युरोपिय महासंघाकडून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर वीस टक्के तर ब्रिटनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर दहा टक्के इतकं शुल्क लावण्यात

आलं आहे. चीनवर ३४ टक्के, बांगलादेशवर आणि पाकिस्तानवर ३७, श्रीलंकेवर ४४, तर इस्त्राईलवर १७ टक्के आयात शुल्क लावण्यात आलं आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय नेमबाजी महासंघ म्हणजे आयएसएसएफ करंडक आजपासून अर्जेटिंनातील ब्युनॉस आयर्स इथं सुरू होत आहे. भारताची ऑलिंपिक विजेती नेमबाज मनू भाकर भारताच्या संघाचं नेतृत्व करणार आहे. स्पर्धेत ४५ देशांमधील चारशे नेमबाज सहभागी होत आहेत. भारताचे सौरभ चौधरी, अनिश भंवाला यांच्यासह ४३ नेमबाज स्पर्धेत सहभागी होत आहेत.

**//<><><><><>//**